# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२८२८९९६, २२०२५३५४.(थेट)
फॅक्स : २२८२१२६९.
ई-मेल पत्ता : headquarters@mjp.gov.in
वेब पत्ता : www.mjp.maharashtra.gov.in

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/ ३८९ २९ मार्च, २०१६

// परिपत्रक क्र.९५//

विषय : मजीप्राच्या पाणी पुरवठा केंद्रांतर्गत अनुज्ञप्तीधारक प्लंबर (पाणी पुरवठा) Licensed Plumbers (Water Supply) च्या याद्या अद्ययावत करण्याबाबत.

सद्य:स्थितीत राज्यातील २४ नागरी व ३० ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची दैनंदिन देखभाल दुरुस्ती व पाणी पुरवठ्याचे काम मजीप्रामार्फत करण्यात येते. संबंधित पाणी पुरवठा केंद्राच्या कक्षेतील ग्राहकांना नवीन/वाढीव /तात्पुरती नळ जोडणी हवी असल्यास, अनुज्ञप्तीधारक प्लंबर यांचे मार्फत स्थानिक कार्यालयाकडे अर्ज सादर करावा लागतो. ग्राहकाने मागणी केलेल्या भागातील मजीप्राच्या वितरण व्यवस्थेस अनुसरुन प्रस्तावित नळ जोडणीची सद्य:स्थिती, अस्तित्वातील वितरण व्यवस्थेचा व्यास इ. बाबी दर्शविणारा नकाशा क्षेत्रीय पाहणी करुन तयार करणे, मजीप्राने विहित केलेल्या नमुन्यात व योग्य कागदपत्रांसह अर्ज सादर करण्यास मदत करणे, नळ जोडणी आकार, सुरक्षा अनामत इ.बाबत ग्राहकांस माहिती देणे, नळ जोडणीस मंजुरी मिळाल्यानंतर मजीप्राने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार प्रत्यक्षात नळ जोडणी देणे इ. कामे नळ कारागीरास करावी लागतात.

सद्य:स्थितीत अनुज्ञप्तीधारक नळ कारागीरांची संख्या अपुरी आहे. त्यामुळे नवीन अनुज्ञप्तीद्वारे जादा नळ कारागिरांची नेमणूक करणे आवश्यक आहे. तसेच नळ कारागीरांच्या कामगिरीचे वेळोवेळी मूल्यमापन करुन अकार्यक्षम नळ कारागिरांची नावे यादीतून कमी करणे गरजेचे आहे.

वरील बाबी लक्षात घेता, पाणी पुरवठा विषयक कामे करण्याकरिता तज्ञ नळ कारागीर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने मजीप्राकडील अनुज्ञप्तीधारक नळ कारागीर (पा.पु.) नोंदणीकरिता खालीलप्रमाणे प्रक्रिया निश्चित करण्यात येत आहे.

मजीप्राकडे अनुज्ञप्तीधारक नळ कारागीर म्हणून नोंद होण्याकरिता खालीलप्रमाणे अर्हता आवश्यक राहील. तसेच म.जी.प्रा. ने निश्चित कलेल्या प्रक्रियेनुसार परिक्षा उत्तीर्ण होणे गरजेचे राहिल.

१. अर्हता - कमीत कमी आय.टी.आय.संस्थेतील संबधित शाखेतील (फिटर/प्लंबर) अर्हता असावी. स्थापत्य अभियांत्रिकी पदवी / पदविकाधारक सुध्दा अनुज्ञप्तीधारक नळ कारागीर (पाणी पुरवठा) म्हणून काम करण्यास पात्र राहतील.
   अ) स्थानिक भाषेचे ज्ञान असावे.
   ब) नकाशावाचनाचे ज्ञान असावे.
२. लेखी व प्रात्यक्षिक परिक्षेत प्रत्येकी किमान ५० टक्के गुण मिळणे अनिवार्य राहिल. परिक्षेसाठी अभ्यासक्रम सोबत जोडला आहे. (परिशिष्ट-१)
३. मजीप्राने विहित केलेली अर्हता धारण करणारे उमेदवार पाणी पुरवठा केंद्राशी संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडे विहित नमुन्यात अर्ज सादर करतील. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे तसेच अनुभवांचे दाखल्यांच्या स्वसाक्षांकीत प्रती सादर करणे आवश्यक राहील.अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे (परिशिष्ट-२).
४. प्राप्त अर्जांची कार्यकारी अभियंता कार्यालयाकडून तपासणी करण्यात येईल व पात्र उमेदावारांचे अर्ज संचालक, मीत्रा यांच्याकडे पाठविण्यात येतील. अर्जासाठी तपासणी शुल्क म्हणून सद्य:स्थितीत रु.५००/- (रु.पाचशे फक्त) इतके शुल्क देय राहील. वार्षिक शुल्कामध्ये वेळोवेळी वाढ करण्याचे अधिकार सदस्य सचिव, मजीप्रा यांना राहतील. या संदर्भात मध्यवर्ती कार्यालयातील लेखा शाखेमार्फत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.
५. पात्र उमेदवारांचे कामासंबंधीचे ज्ञान तपासण्याच्या दृष्टीने प्रात्यक्षिक व लेखी परिक्षा तीन वर्षातून एकदा आयोजित करण्याची जबाबदारी व अधिकार संचालक, मीत्रा यांना राहतील. या कालावधीमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार सदस्य सचिव, मजीप्रा यांना राहतील.
६. सदर परिक्षेकरिता प्रत्यक्ष खर्चावर आधारित परिक्षा शुल्क आकारण्याचे अधिकार संचालक, मीत्रा यांना राहतील.
७. संचालक, मीत्रा यांनी पात्र उमेदवारांना परिक्षा उत्तीर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र व गुणपत्रिका निर्गमित करतील.
८. संचालक, मीत्रा यांनी पात्र ठरविलेल्या नळ कारागीरांना अनुज्ञप्ती जारी करण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता, मजीप्रा यांना राहतील. अनुज्ञप्ती कालावधी हा एक वर्षासाठी राहील. अनुज्ञप्ती धारक नळ कारागिरांची यादी वेळोवेळी अद्ययावत करुन ग्राहकांना सुलभरित्या उपलब्ध होईल, हे पाहण्याची जबाबदारी संबंधित कार्यकारी अभियंता यांची राहील.

९. अनुज्ञप्तीधारक नळ कारागिरांना पाणी पुरवठा विषयक कामे संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने करता येतील.

१०.अनुज्ञप्तीचे दरवर्षी नूतनीकरण करणे आवश्यक राहील. नवीन अनुज्ञप्ती व अनुज्ञप्ती नूतनीकरणाकरिता सद्य:स्थितीत वार्षिक रु.२०००/- इतके शुल्क देय राहील. वार्षिक शुल्कामध्ये वेळोवेळी वाढ करण्याचे अधिकार सदस्य सचिव, मजीप्रा यांना रहातील. या संदर्भात मध्यवर्ती कार्यालयातील लेखा शाखेमार्फत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

११.अनुज्ञप्तीधारक नळ कारागीर यांच्या कामाबाबत वार्षिक गोपनीय अहवाल संबंधित उप अभियंता हे लिहितील व कार्यकारी अभियंता हे प्रतिवेदित करतील. या गोपनीय अहवालांच्या आधारे समाधानकारकरित्या काम न करणाऱ्या अथवा इतर तक्रारी असणाऱ्या अनुज्ञप्तीधारक नळ कारागीर यांना काळ्या यादीत टाकण्याबाबत कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित कार्यकारी अभियंता यांची राहील.

**सोबत : वरीलप्रमाणे.**

(संतोष कुमार)
सदस्य सचिव

प्रत : संचालक (तांत्रिक), मजीप्रा, मुंबई यांना माहितीसाठी.

प्रत : संचालक (वित्त), मजीप्रा, सिडको भवन, नवी मुंबई यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत : मुख्य अभियंता, मजीप्रा, ठाणे/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

प्रत: अधीक्षक अभियंता, मजीप्रा मंडळ, ठाणे/ पनवेल/पुणे/ सांगली/नाशिक/ अहमदनगर /औरंगाबाद/ लातूर/ नांदेड/ अकोला/ अमरावती /नागपूर/ चंद्रपूर / यांना माहितीकरिता तथा योग्य कार्यवाहीकरिता.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

## मजीप्राच्या पाणी पुरवठा केंद्रांतर्गत अनुज्ञप्तीधारक प्लंबर (Licensed Plumbers) साठी पात्रता परिक्षेचा अभ्यासक्रम

**Pattern and Syllabus for the examination**

1. **Written paper**

   Time – 3 hours

   Maximum marks – 100

2. **Practical Examination-**

   Maximum marks – 100

   Examination shall consist of a practical test relating to plumbing operation. Field testing may be laid out as may be considered suitable by the examiners.

*The syllabus shall be restricted to plumbing knowledge related to the following topics.*

**Syllabus for Written paper and Practical Examination- Water Supply**

1) Local bye-laws governing supply of water, knowledge of procedure to obtain water connection in new premises.
2) Pipe materials, common sizes, selection of size, laying of pipes and pipe jointing etc.
3) Fixtures - Specials, appurtenances, etc..
4) Tapping of mains, ferrules, cocks, water meters etc..
5) Storage reservoirs – underground, surface, overhead as may be needed for maintaining satisfactory supply of water within the premises, capacity, constructional features, precautions to avoid contamination of water.
6) Public health hazards of faulty plumbing cross connection, back-siphonage etc. and remedies.
7) Disinfection of pipes – chemicals to be used, mode of disinfection etc.
8) Significance of routine chemical and bacteriological report on water samples.

**Practical Examinations** – Maximum marks 100.

Examination shall consist of a practical test relating to plumbing operation. Field testing may be laid out as may be considered suitable by examiners.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

## मजीप्राच्या पाणी पुरवठा केंद्रातर्गत अनुज्ञप्तीधारक प्लंबर-पाणी पुरवठा (Licensed Plumbers-Water Supply) साठी पात्रता परिक्षेचा अभ्यासक्रम

**परिक्षेचे स्वरुप व अभ्यासक्रम :**

१. लेखी परिक्षा : वेळ - ३ तास, कमाल गुण - १००

२. प्रात्यक्षिक परिक्षा : वेळ – आवश्यकतेनुसार निश्चित करण्यात येईल.
कमाल गुण – १००
उमेदवाराचे प्लंबिंग संबंधीचे ज्ञान तपासण्याच्या दृष्टीने प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात येईल व त्यासाठी सुयोग्य प्रक्रिया निश्चित केली जाईल.

परिक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये खालील बार्बीशी संबंधीत प्लंबिंगच्या ज्ञानाचा समावेश असेल.

**लेखी व प्रात्यक्षिक परिक्षेसाठी अभ्यासक्रम**

१. पाणी पुरवठ्यासंबंधी स्थानिक नियमावली, नविन नळ जोडणी मिळण्यासाठी आवश्यक प्रक्रियेचे ज्ञान
२. विविध प्रकारचे पाईप्स्, सर्वसाधारण आकार, योग्य आकाराची निवड, पाईप टाकणे व जोडणे
३. जोडणी साहित्य – स्पेशल्स, ॲपरटेनन्स (स्लुईस वॉल्व, गेट वॉल्व इ.)
४. मुख्य जलवाहिनीस जोडणी, फेरुल, कॉक्स्, जलमापक इ.
५. साठवण टाक्या – प्रस्तावित ग्राहक आवारात समाधानकारक पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार भूमीगत टाक्या, जमीनीवरील टाक्या, उंच टाक्या इ., त्यांची क्षमता, त्यांचे बांधकाम, प्रदूषण टाळण्यासाठी उपाययोजना इ. साठी च्या पर्यायांची निवड.
६. क्रॉस कनेक्शन, उलट प्रवाह (Siphonage), इ.सारख्या प्लंबिंगच्या चुकांमळे सार्वजनिक आरोग्यासाठी उद्भवणारे संभाव्य धोके व त्यावरील उपाययोजना
७. पाईपांचे निर्जंतुकीकरण – वापरावयाची रसायने, निर्जंतुकीकरण करण्याची पध्दत इ.
८. पाण्याच्या नमुन्यांची नियमित जैविक व रासायनिक तपासणी करण्याचे महत्व

**प्रात्यक्षिक परिक्षा :** कमाल गुण - १००

प्लंबिगच्या कामासंबंधी प्रत्यक्ष ज्ञानावर आधारित प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात येईल. त्या दृष्टीने प्रत्यक्ष क्षेत्रीय नियोजन करण्याचा अधिकार परिक्षकांना राहील.

अर्ज क्र._____

परिशिष्ट -२

२ पासपोर्ट आकाराचे फोटो

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

जलव्यवस्थापन विभाग _________

अनुज्ञप्तीधारक नळ कारागीर म्हणून पात्रतेसाठी अर्जाचा नमुना

**प्रति,**

कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
जलव्यवस्थापन विभाग _________

मी --------------------------

खाली दिलेल्या तपशीलानुसार, अनुज्ञप्तीधारक नळ कारागीर म्हणून पात्रतेसाठी अर्ज सादर करीत आहे. त्याकरिता मी आवश्यक शुल्काचा भरणा करण्यास तयार आहे. अर्जासोबत सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे सोबत जोडली आहेत. खाली नमूद केलेली माहिती ही माझ्या माहितीनुसार खरी असून, त्यात तफावत आढळून आल्यास, माझा अर्ज बाद करण्याची कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे होऊ शकेल व त्यात माझी हरकत नसेल.

**तपशील**

| | | |
|---|---|---|
| १. | अर्जदाराचे पूर्ण नांव | |
| २. | पत्ता | |
| ३. | कार्यालय दूरध्वनी क्रमांक | |
| ४. | निवासी दूरध्वनी क्रमांक | |
| ५. | भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.) | |
| ६. | ई-मेल आयडी | |
| ७. | अर्जासोबत सादर केलेली अर्हता व अनुभव दर्शविणाऱ्या कागदपत्रांची यादी | |
| ८. | अर्जासोबत अदा केलेले तपासणी शुल्क | रु. |

सोबत : वरीलप्रमाणे.

अर्जदाराची सही